# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबई उपनगरातील बोरीवली-पूर्व येथील गणेशनगर हायवेच्या बाजुला टाटा पॉवर हाऊस येथील झोपडपट्टीतील अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याबाबत**

**(१) २४४७ (२२-१२-१०१४). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बोरीवली-पूर्व येथील गणेशनगर हायवेच्या बाजुला टाटा पॉवर हाऊस येथील झोपडपट्टीतील अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१४ च्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१५) :** (१) व (२) होय. या प्रकरणी फिर्यादीवरुन कास्तुरबा मार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २६१/२०१४ भारतीय दंड विधान कलम ३७६(१), बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा २०१२, कलम ५, ६ अन्वये दिनांक १६.०८.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली सत्र न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाण्यात तीनहात नाका येथील बेस्ट बसस्टॅण्ड परिसरात पट्टेरी वाघाची कातडीची होत असलेली बेकायदा विक्री**

**(२) २६५६ (१५-०१-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यात तीनहात नाका येथील बेस्ट बसस्टॅण्ड परिसरात पट्टेरी वाघाची कातडी विकण्यासाठी आलेल्या दुकलीला ठाणे क्राईम ब्रँचच्या पोलीसांनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार दोषीविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांचेविरुध्द वागळे इस्टेट पोलीस स्टेशन येथे गुरक्र.५८/१४ वन्य प्राणी संरक्षण कायदा, १९७२ कलम ९, ४४, ४९ (ब), ५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपीतांकडून हस्तगत करण्यात आलेले वाघ या संरक्षित वन्य प्राण्याचे कातडे तपासणी करीता भारतीय प्राणी सर्वेक्षण प्रादेशिक केंद्र, विद्यानगर, आकुर्डी, पुणे तसेच नखे व दात असा मुद्देमाल वाईल्ड लाईफ क्राईम कंट्रोल ब्युरो इंडिया, नवी मुंबई येथे पाठविण्यात आले असून सदर तपासणीचे अभिप्राय प्राप्त होताच अटक केलेल्या आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील कुरार पोलिस ठाणेअंतर्गत वाढत असलेली गुन्हेगारी**

**(३) २८८० (१५-०१-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील कुरार पोलिस ठाणेअंतर्गत इंदिरा नगर नाका, पटेल नगर व पिपरीपाडा या परिसरात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असून स्थानिक गुंडाची दहशत वाढत असल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास वरिष्ठ पोलीस निरिक्षक, कुरार पोलीस ठाणे, मालाड, मुंबई यांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार उपरोक्त ठिकाणी सदरचे गुन्हे रोखण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे त्याचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) :** (१) होय.
(२) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोलीस निरिक्षक व दिवसपाळी/रात्रीपाळी पोलीस निरिक्षक सदर परिसरात नियमितपणे भेटी देत असून सदर परिसर कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच मोहल्ला कमेटी मिटींग व बातमीदाराकडून माहिती गोळा करुन असा कोणताही अनुचित प्रकार घडल्यास योग्यती कार्यवाही करीत आहेत. तसेच विषेष पथकाच्या मदतीने सदर परिसरात कोबींग ऑपरेशनचे आयोजन करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस कर्मचारी व निवृत्त पोलीस कर्मचा-यांकरिता विशेष गृहयोजना

**(४) ३८२८ (१५-०१-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी व मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद ह्या मोठ्या शहरात कार्यरत पोलीस कर्मचारी व निवृत्त पोलीस कर्मचा-यांकरिता शासनाने विशेष गृहयोजना हाती घेतली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :** (१) व (२) पोलीस विभागातील कर्मचा-यांना स्वमालकीची घरे बांधण्यासाठी योजना राबविण्याबाबत पोलस महासंचालकाकडून सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात आले आहे. या योजनेतंर्गत अल्प दरात उपलब्ध असलेल्या भूखंडावर लघु सरकारी गृहनिर्माण संस्थांच स्थापना करणे, शासकीय अथवा खाजगी मालकांकडून योग्य दरात भूखंड उपलब्ध करुन देणे आणि सदर भूखंड लहान प्लॉटमध्ये विभागून निवासी इमारतीकरिता विकसित करणे. पोलीस गृहनिर्माण महामंडळाने सहकारी गृहनिर्माण संस्थांना भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करावी अश्या सूचना सर्व घटक प्रमुखांना करण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदपूर (जि. लातूर) येथे सातत्याने चोऱ्या व दरोडे पडत असल्याबाबत

**(५) ४१६९ (१५-०१-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदपूर (जि. लातूर) येथे सातत्याने रोजरोसपणे चोऱ्या व दरोडे पडत असून श्री.दयानंद मारोती मददेवार रा.भोई गल्ली यांच्या घरामध्ये चोरी होऊन ६ ते ७ तोळ्याच्या दागिन्यासह रोकड लुटून नेल्याचे दिनांक २९ जुलै, २०१२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचदिवशी पोलीस स्टेशन अहमदपूर येथे तक्रार दाखल करुनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप शासनाने चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व किती कालावधीत सदर चौकशी पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१५) :** (१) प्रश्नात नमूद चोरीच्या गुन्ह्यात रु.१८,०००/- किंमतीचे दागिने चोरुन नेले हे खरे आहे.
(२), (३) व (४) प्राप्त फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन अहमदपूर येथे गु.र.नं. १२७/१२ भा.द.वि. कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येवून कसोशीने तपास करुनही गुन्हा उघडकीस न आल्याने 'अ' वर्गात अखेर अहवाल पाठविण्यात आला आहे.

---

## राजयातील सुमारे ४२६ धर्मादाय हॉस्पिटलमधून आर्थिकदृष्ट्या कमी उत्पन्न असलेल्या तसेच गरिबांवर मोफत व सवलती दरात उपचार देण्याबाबत

**(६) ४४५६ (१५-०१-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुमारे ४२६ धर्मादाय हॉस्पिटलमधून आर्थिकदृष्ट्या कमी उत्पन्न असलेल्या तसेच गरिबांवर मोफत व सवलती दरात उपचार देण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णाला दिले गेलेले उपचार, केल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या चाचण्या आणि त्याचा खर्च हा खाजगी हॉस्पिटलकडून योग्य प्रकारे होत नसल्याच्या अनेक तक्रारी रुग्णांकडून वारंवार येत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भातील समितीने तीन महिन्यांच्या हॉस्पिटलच्या केसपेपरचे ऑडिट करून त्याचा अहवाल राज्याच्या आरोग्य विभागाला सादर केला आहे काय,
(४) असल्यास, सदर अहवालातील दोषी धर्मादाय हॉस्पिटलच्या व्यवस्थापन व विश्वस्तांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे, राज्यातील एकूण ४०८ धर्मादाय रुग्णालय व धर्मादाय वैद्यकीय केंद्रे हे सर्वसाधारणपणे निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना अनुक्रमे मोफत व सवलतीच्या दराने उपचार देतात.
(२) व (३) खाजगी रुग्णालये या विभागाच्या कार्यकक्षेत येत नाहीत. तथापि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. १९.११.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मुंबई विश्वस्त कायद्यांतर्गत नोंदणीकृत धर्मादाय रुग्णालयाची तपासणी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आल्यानुसार राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर येथे तपासणी पथकाद्वारे काही

धर्मादाय रुग्णालयाची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीचे अहवाल उच्चस्तरीय समितीस सादर केले.

(४) सदर अहवालातील दोषी मुंबईतील ९ व पुणे येथील ३ धर्मादाय रुग्णालयांना शासनाच्या विविध विभागानी /कार्यालयीन व केंद्र शासनाने दिलेल्या विविध सोयी/सवलती काढून घेणेबाबत शासनाच्या विविध विभागांना/ कार्यालयांना व केंद्र शासनास कळविण्यात आले आहे तसेच मुंबईतील ५ धर्मादाय रुग्णालयांना ताकीद देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य सरकारने "महा ई लॉकर" ही नवी योजना सुरु केली असल्याबाबत**

**(७) ४६१६ (१५-०१-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने "महा ई लॉकर" ही नवी योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणते निकष अटी ठरविण्यात आल्या आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१५) :** (१) प्रायोगिक तत्वावर सुरु केली आहे.

(२) शासनाच्याविविध विभागाकडून नागरिकाला वितरित करण्यात आलेली प्रमाणपत्रे व दाखले, ई- लॉकर मध्ये साठवली जातील. तसेच सेवा पुरविणा-या विभागाला नागरिकांच्या परवानगीने विभागाला आवश्यक असणारे प्रमाणपत्र / दाखले थेट नागरिकाच्या ई-लॉकर मधून प्राप्त करुन घेणे शक्य होते.

(३) ज्या नागरिकांकडे आधार क्रमांक आहे असे नागरिक ई-लॉकर सेवेचा लाभ घेऊ शकतात.

---

**राज्यातील पत्रकारांचे प्रलंबित प्रश्न**

**(८) ४६३१ (१५-०१-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांना संरक्षण कायदा होणेबाबत तसेच "क" वर्ग दैनिकांना "ब" वर्ग प्रमाणे जाहिराती मिळावी असे प्रश्न गेली २० वर्षे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) पत्रकारांवरील वाढते हल्ले लक्षात घेऊन, पत्रकार संरक्षण कायद्याच्या मसुद्यावर विचार करुन शासनाला शिफारस करण्याकरिता दि. ०४.०७.२०११ रोजी मंत्रिमंडळ समिती गठीत करण्यात आली. या समितीचा अहवाल मंत्रिमंडळापुढे सादर करण्याची कार्यवाही चालू आहे.

शासनमान्य यादीवर १७६६ वृत्तपत्रे असून "अ" वर्गाची ७८ दैनिके, ५ साप्ताहिके, "ब" वर्गाची १४८ दैनिके व २५ साप्ताहिके आणि "क" वर्गाची ५१७ दैनिके व ९९३ साप्ताहिके आहेत. यापैकी "अ" व "ब" वर्गाच्या वृत्तपत्रांना शासनाची रंगीत दर्शनी जाहिरात दिली जाते. तर "क" वर्गाच्या वृत्तपत्राला कृष्णधवल जाहिरात दिली जाते. "क" वर्गातील जी वृत्तपत्रे रंगीत स्वरुपात निघतात, त्यांना किमान "ब" वर्गाएवढ्या जाहिराती रंगीत स्वरुपात देण्याबाबतची पडताळणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हापरिषद अंतर्गत कृषिविस्तार अधिकारी पदाच्या लेखी परिक्षेच्या उत्तरपत्रिका विकणा-याला अटक केल्याबाबत

**(९) ४६७० (१५-०१-२०१५). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हापरिषद अंतर्गत कृषिविस्तार अधिकारी पदाच्या लेखी परिक्षेच्या उत्तरपत्रिका विकणा-या ११ जणांना औरंगाबाद येथे गुन्हे अन्वेषण विभागाने दिनांक २ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) अयल्यास, या प्रकरणी अटक झालेल्यां मध्ये वरीष्ठ शासकीय अधिका-यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०१५) :** (१) होय.

(२) विक्रीकर निरीक्षक दर्जाच्या अधिका-यास अटक करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी पो.स्टे.सातारा, औरंगाबाद शहर येथे गु.र.नं. १८७ /२०१४ भा.दं.वि.कलम ४२०, १०७, १०९, ११४, १२० (ब), ३४ सहकलम ३(२), ४(२), ५(२), ६ आणि ८ महाराष्ट्र विद्यापीठ शिक्षण मंडळ आणि इतर विशिष्ट परिक्षांमधील गैरव्यवहार प्रतिबंध कायदा १९८२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) सदर प्रकरणाचा तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरामध्ये गँगस्टर, हत्या बलात्कार या सारख्या घटना घडत असल्याबाबत**

**(१०) ५४३८ (०६-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामध्ये कायदा आणि सुव्यवस्था अत्यंत धोक्यात आली असून नोव्हेंबर २०१४ ते जानेवारी २०१५ च्या दरम्यान जवळपास १५ हत्या,तसेच घरफोडी, अपहरण, बलात्कार, विनयभंग, हप्ता वसुली, या सारख्या घटना घडत असून पोलीस विभागाचे नियंत्रण नसल्याने शहरात तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घटनावर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) :** (१) नाही.

(२) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत घडणाऱ्या हत्या, तसेच घरफोडी, अपहरण, बलात्कार, विनयभंग, हप्ता वसुली या सर्व गुन्हयांना आळा व पायबंद घालण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातर्फे सशस्त्र फिरत्या कमांडो पथकाची स्थापन करण्यात आली आहे. मोटर सायकल वरुन तसेच वाहनांवरून पेट्रोलींग सुरु आहे. महिला पोलीसांची गस्त कार्यान्वित करण्यात आली आहे. याबाबत वरिष्ठ पातळीवरुन लक्ष ठेवण्यात येत आहे. याबाबत वरिष्ठ पातळीवरुन लक्ष ठेवण्यात येत आहे. त्यामुळे जनमानसात असुरक्षिततचे व भितीचे वातावरण पसरलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात विविध विभागाच्या बैठकीला पोलीस अधिक्षक गैरहजर राहत असल्याबाबत**

**(११) ५६११ (०६-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील जिल्हा अधिकारी कार्यालयात जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती यासह विविध विभागाच्या बैठकीला पोलीस अधिक्षक उपस्थित रहाणे बंधनकारक असतांना पोलीस अधिक्षक बैठकीला सातत्याने गैरहजर राहील्यामुळे काही बैठका तहकूब करुन पुन्हा घ्यावा लागण्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १४ डिसेंबर रोजीची दक्षता कमिटीची बैठक पोलीस अधिक्षकांच्या गैरहजेरीमुळे तहकूब करण्यात आली ती बैठक १५ जानेवारी रोजी पोलीस अधिक्षकांच्या

गैरहजेरीत झाली आहे सदरहू बैठकीस अनुसूचित जाती जमाती (अन्याय व अत्याचार) प्रतिबंधात्मक अधिनियम १९८९ सुधारीत १९९५ अन्वये माहे डिसेंबर, २०१४ अखेर पर्यतच्या १४ प्रकरणातील अत्याचार पिडीताबाबत चर्चा असतांना त्यावेळी पोलीस अधिक्षकांची उपस्थिती बंधनकारक असूनही ते या बैठकीला उपस्थित न राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू बैठकीस अनुसूचित जाती जमाती (अन्याय व अत्याचार) प्रतिबंधात्मक अधिनियम १९८९ सुधारीत १९९५ अन्वये माहे डिसेंबर, २०१४ अखेर पर्यतच्या १४ प्रकरणातील अत्याचार पिडीताबाबत चर्चा झालेली असतांना त्यावेळी पोलीस अधिक्षकांची उपस्थिती बंधनकारक असूनही ते या बैठकीला उपस्थित न राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस अधिक्षकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी रविवार सार्वजनिक सुट्टी होती. या दिवशी दक्षता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आलेली नाही.

दिनांक १२.०१.२०१५ व १३.०१.२०१५ रोजी हिंगोली शहरात दोन गटात धार्मिक तेढ निर्माण होऊन जातीय तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता.

शहरात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने विविध सामाजिक गटातील पदाधिकाऱ्यांशी सुसंवाद साधून शहरात शांतता निर्माण करण्याच्या कामात दिनांक १४.०१.२०१५ व १५.०१.२०१५ रोजी पोलीस अधिक्षक व्यस्त असल्याने बैठकीत उपस्थिती राहू शकले नाहीत. तथापि, पोलीस अधिक्षकांच्या वतीने पोलीस उप अधिक्षक (गृह) हे या बैठकीस उपस्थित राहिले व त्यांनी बैठकीत परिपुर्ण १४ प्रकरणे सादर केली.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानुखुर्दच्या (मुंबई) येथील महाराष्ट्र नगर परिसरातील इमारतीच्या रिकाम्या घरांचे कुलूप तोडून गुंड-दलाल वीज, पाणी, फुकटात वापरत असल्याबाबत

**(१२) ५७०८ (०९-०४-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप सोपल (बार्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानखुर्दच्या (मुंबई) येथील महाराष्ट्र नगरात मालाडच्या लालजीपाडा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले असून गुंड-दलालाकडून या परिसरातील सात मजली इमारतीच्या रिकाम्या घरांचे कुलूप तोडून घुसखोरी करुन वीज व पाणी यांचा वापर फुकट करीत असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून तेथील गुंड, दलाल यांच्यावर काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी ट्रॉम्बे पोलीस ठाणे येथे गुरक्र. ३२/१५ कलम ४४८, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ भादंविसं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील १९ आरोपी व इतर दलाल यांचेपैकी ८ आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांचेकडून रुपये ६,२०,०००/- ची मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जबरी चोरीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढल्याबाबत**

**(१३) ५८१० (०६-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जबरी चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत असून देशात महाराष्ट्रात सर्वाधिक जबरी चोरीचे प्रमाण आढळून आले असून राज्यात मुंबईचा जबरी चो-यांमध्ये पहिला क्रमांक तर पुण्याचा तिसरा क्रमांक लागत असल्याचा धक्कादायक प्रकार माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जबरी चोरीचे वाढत असलेले प्रमाण त्वरित थांबविण्याबाबत तसेच गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) :** (१) होय.
(२) पोलीस महासंचालकांनी राज्यातील सर्व पोलीस घटकांना गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना पाठविल्या आहेत.

गुन्हेगारीला आळा बसावा याद्दष्टीने पोलीस स्टेशन हद्दीत बिटमार्शल, मोबाईल पायी गस्त, साध्या वेषातील गस्त, कोंबिंग ऑपरेशन, पिटर मोबाईल गस्त रात्रदिंवस ठेवण्यात आली आहे. महिलांची छेडछाड होण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी प्रतिबंधक पथके स्थापन करण्यात आली आहेत. शाळा, कॉलेज, गर्दीची ठिकाणी, मार्केट, रेल्वे स्टेशन इत्यादी ठिकाणी वाढविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भांडुप येथील माऊंट मेरी इंग्रजी शाळेतील चार वर्षाच्या मुलींवर शाळेतील पर्यवेक्षकाने बलात्कार केल्याबाबत**

**(१४) ६५२१ (०६-०४-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भांडुप (पश्चिम) तुळशेत पाडा येथील माऊंट मेरी इंग्रजी शाळेतील चार वर्षाच्या मुलीवर मधल्या सुट्टी शाळेतील पर्यवेक्षक केसरीनंदन उपाध्याय यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास शौचालयात बलात्कार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) फिर्यादीवरुन भांडून पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ४५४/२०१४ भारतीय दंड विधान कलम ३७६ (आय), ३५४(अ) तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा २०१२ कलम ४, ८, १२ अन्वये दिनांक १६.१२.२०१४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे आरोपीस अटक करण्यात आली असून त्यांचे विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

---

**नाळवंडी (ता.पाटोदा, जि.बीड) गावात महिला सरपंचाच्या हत्येबाबत**

**(१५) ८७४५ (०६-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गावात महिला सरपंच कविता डोके यांचा मृतदेह आढळला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कविता डोके यांची हत्या झाली असून या प्रकरणी चौकशीची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी मयताचे भावाच्या फिर्यादीवरुन अंमळनेर पोलीस ठाणे येथे दि.२९.१.२०१५ रोजी गु.र.नं. ६/२०१५ कलम ३०२, ३४ भादवि प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तथापि, गुन्हयांच्या तपासाअंती मयताने आत्महत्या केल्याचे व आरोपींनी मयतास आत्महत्याच करण्यास भाग पाडले म्हणून मयताचा पती व अन्य एका महिलेविरुध्द कलम ३०६, ४९८(अ), ३४ भादंवि प्रमाणे मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीचे नायब तहसिलदार व डाटा ऑपरेटर यांना लाचलुचपत खात्याच्या पथकाने लाच घेताना पकडल्याबाबत**

**(१६) ९३६६ (०६-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीचे नायब तहसिलदार नाथाजी सगट, व डाटा ऑपरेटर यांना १५ हजार रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपाखाली लाचलुचपत खात्याच्या पथकाने नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) श्री.रुपेश विठ्ठल जाधव, रा.उर्फी, पो.पन्हाळेकाझी, ता.दापोली, जिरत्नागिरी यांना चिरेखाणीचा परवाना देण्यासाठी व दंड रक्कम भरुन न घेता प्रकरण मिटविण्यासाठी श्री.नाथाजी संभाजी सगट, नायब तहसिलदार यांनी तक्रारदार यांचेकडे रु.१५०००/- इतकी लाचेची मागणी करुन श्री. नितीन शिर्के, डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचेमार्फत स्विकारताना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. या संदर्भात त्यांचेविरुध्द दापोली पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१४/२०१४, लाचलुचापत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३ (१)(ड) सह १३(२) अन्वये दिनांक ३०.१२.२०१४ रोजी गुन्हा दाखल अटक करण्यात आला असून त्यानंतर मा.न्यायलयाने जामीनावर मुक्त केले आहे. श्री.सगट, नायब तहसिलदार यांना विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे दिनांक १६.०१.२०१५ च्या आदेशान्वये अटकेच्या दिनांकापासून (दिनांक ३०.१२.२०१४) शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच श्री.सगट यांचेविरुध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यास परवानगी देणेसंदर्भात सक्षम प्राधिकारी यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

---

**पेण (जि.रायगड) येथील अन्न व औषधे प्रशासन विभागातील निरिक्षकांनी लाच घेतल्याबाबत**

**(१७) ९६४२ (०६-०४-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन कार्यालयातील निरिक्षक जयंत यादव यांनी मेडिकलच्या दुकानासाठी लागणारा परवाना देण्याकरीता १५ हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निरिक्षक जयंत यादव यांची विभागीय चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) श्री.सुरज जगन्नथ मोकल, रा.जोहे, ता.पेण यांनी केलेल्या तक्रारीनुसार श्री.जयंत विठ्ठल यादव, औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन यांनी रु.२०,०००/- इतकी लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु.१५,०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचेविरुध्द पेण पोलीस स्टेशन येथे गुरक्र.०३/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे दिनांक २८.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात त्यांना दिनांक २८.०१.२०१५ रोजी अटक करण्यात आली होती. मा.न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी यांची परवानगी देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने प्रस्ताव पाठविला आहे. श्री.जयंत यादव, औषध निरीक्षक यांना दिनांक २८.०१.२०१५ च्या आदेशान्वये शासनसेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे श्री.जयंत यादव व त्यांची सौ.सुनिता यादव यांचेकडे एकूण रुपये ६०,१७,०७०/- इतक्या किंमतीची मालमत्ता प्रथमदर्शी निष्पन्न झाल्याने त्यांच्या मालमत्तेची उघड चौकशी चालू आहे.

---

### बनावट पदवी प्रमाणपत्रांची विक्री करणाऱ्या संघटीत गुन्ह्याबाबत

**(१८) ९६८८ (०७-०४-२०१५). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात देशभरातील नामांकित विद्यापीठांच्या बनावट पदव्या आणि पदव्युत्तर प्रमाणपत्रांची विक्री करणारे रॅकेट असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सिटी अकॅडमी ऑफ प्रोफेशनल स्टडीज, पुणे या कार्यालयात छापा टाकून १) सनराईज विश्वविद्यालय, राजस्थान चे बी.ए. बी.कॉम चे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे गुणपत्रक २) टेक्नो ग्लोबल युनिव्हर्सिटी, मेघालय चे एका विद्यार्थ्याचे गुणपत्रक, मायग्रेशन सर्टिफिकेट व प्रोव्हिजनल सर्टिफिकेट ३) सीएमजे युनिव्हर्सिटी ४) हैद्राबाद बोर्ड ऑफ हायर एज्यूकेशनचे एका विद्यार्थ्याचे पासिंग सर्टिफिकेट व गुणपत्रक व दुस-या विद्यार्थ्याचे मायग्रेशन कम ट्रान्सफर सर्टिफिकेट व पैसे भरल्याची इतर पावती पुस्तके हस्तगत करण्यात आलेली आहे.

त्यानुसार कोंढवा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १९/२०१५, भा.दं.वि. कलम ४६७, ४६८, ४७१, ४२० व ३४ प्रमाणे दि.१४.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. गुन्ह्यात आरोपी सागर सूर्यनारायण चेबुड्ना यांस अटक करण्यात आलेली आहे.

आरोपीकडे हैद्राबाद बोर्ड ऑफ हायर एज्युकेशनचे मार्कशिट, पास सर्टिफिकेट, मायग्रेशन कम ट्रान्सफर सर्टिफिकेट आढळून आल्याने, त्याबाबत सेक्रेटरी, आंध्रप्रदेश स्टेट कौन्सिल ऑफ हायर एज्युकेशन यांचेकडे लेखी चौकशी केली असता, हैद्राबाद बोर्ड ऑफ हायर एज्युकेशन या नावाने शासन मान्यता प्राप्त बोर्ड अस्तित्वात नसल्याचे कळविले आहे. तसेच उपरोक्त प्रमाणपत्र हे बोगस असल्याचे कळविले आहे.

तसेच १) सनराईज विश्वविद्यालय, राजस्थान २) टेक्नो ग्लोबल युनिव्हर्सिटी, मेघालय ३) सीएमजे युनिव्हर्सिटी मेघालय, या खाजगी युनव्हर्सिटीशी पत्रव्यवहार करुन त्यांचेकडे जप्त केलेले प्रमाणपत्र त्यांचेमार्फत केले आहे, अगर कसे ? व यातील आरोपीच्या संस्थेला त्यांच्या विद्यापिठाकडून अधिकार देयात आले होते अगर कसे ? या बाबत तपास करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरामध्ये व जिल्ह्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून आर.टी.ओ. एजंटसह चार जणांना लाच घेताना अटक करण्यात आल्याबाबत

**(१९) १०९०० (०७-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये व पुणे जिल्ह्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून तीन ठिकाणी धडक कारवाई करुन पोलीस व आर.टी.ओ. एजंटसह चार जणांना लाच घेताना जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात पकडले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मोजणीप्रमाणे जमिनीची सीमा निश्चित करुन देण्यासाठी ३०००० रुपयांची लाच घेताना भूमीअभिलेख उपअधिक्षकाला रंगेहात पकडण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, या लाचखोर अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१५) :** (१), (२), (३) व (४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पुणे शहर व जिल्ह्यामध्ये एकूण २ ठिकाणी लाचेच्या मागणी प्रकरणी जानेवारी, २०१५ मध्ये कारवाई करण्यात आली आहे.

त्यापैकी श्री.अकबर गुलाम शेख याने केलेल्या तक्रारीनुसार सलीम मोटार ड्राईव्हींग स्कुलमधील प्रशिक्षणार्थीचा शिकाऊ परवाना काढण्यासाठी लाचेची मागणी करुन ती स्विकारली असल्याने श्री.मोहसीन शेख व श्री.शोहेब शाकीर शेख या खाजगी आर.टी.ओ. एजंट, यांना दिनांक १६.०१.२०१५ रोजी रंगेहाथ पकडण्यात आले आहे. त्यांचेविरुध्द निगडी पोलीस स्टेशन, पुणे शहर भाग-६ येथे गुरक्र.३०१७/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ८ सह भा.दं.वि. कलम १०९ प्रमाणे दिनांक १७.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने दोन्ही आरोपींना दिनांक १७.०१.२०१५ रोजी अटक करण्यात आल होती. मा.न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

त्याप्रमाणे श्री. संदिप गोरडे यांने केलेल्या तक्रारीनुसार त्यांच्या जमिनीचे मोजणीच्या नकाशाप्रमाणे निघालेले जादा क्षेत्र काढण्यासाठी व जमीनीचे डिमार्केशन (खुणा) दर्शवून देण्यासाठी रु.३०,०००/- इतकी लाचेची रक्कम मागणी करुन ती स्विकारले प्रकरणी, श्री.मुनीर ईस्माईल आतार, उप अधिक्षक, भूमी-अभिलेख यांचेविरुध्द घोडेगांव पो.स्टे. पुणे ग्रामीण भाग-६ येथे गुरक्र.१/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२) प्रमाणे दिनांक १६.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यत आला आहे. सदर गुन्ह्यात त्यांना दिनांक १६.०१.२०१५ रोजी अटक करण्यात आली होती मा.न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

श्री.मुनिर ईस्माईल आतार यांना दिनांक २९.०१.२०१५ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी यांची मान्यता देण्यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने प्रस्ताव सादर केला आहे.

---

**बाऱ्हे (ता.सुरगाणा जि.नाशिक) गावीतील नवीन पोलिस स्टेशनबाबत**

**(२०) १०९१३ (०६-०४-२०१५). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाऱ्हे (ता.सुरगाणा, जि.नाशिक) या गावी गेल्या दोन वर्षा पासून नवीन पोलिस स्टेशन मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलिस स्टेशन कामाची सद्यस्थिती काय आहे,

(३) तसेच, सदर आवश्यक पदे पूर्ण भरुन पोलीस स्टेशन प्रत्यक्ष केव्हा सुरु होणार आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :** (१) होय,

शासन निर्णय क्र.पीओएस ०८१०/प्र.क्र.४३६/पोल-३, दि.२०.१०.२०१० अन्वये बाऱ्हे पोलीस ठाणे निर्मितीस मान्यता मिळालेली आहे.

(२) सदर पोलीस स्टेशन करीता भाडे तत्वावर जागा घेण्यात आली.

(३) व (४) बाऱ्हे पोलीस ठाण्यासाठी पोनि-१, सपोउनि-०४ पोहवा-१२, पोना-०४, पोशि-१४ अशी एकूण ३५ पदे मंजूर असून सदरची पदे पुर्णत: भरण्यात आली आहेत. पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

---

## सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यात अवैध मटका व जुगाराचे अड्डे चालू असल्याबाबत

**(२१) १०९१४ (०६-०४-२०१५). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातील १) बोरगांव २) सुरगाणा ३) बाऱ्हे ४) उंबरठाण ५) पांगारणे येथे अवैध मटका व जुगाराचे अड्डे चालू आहेत या संदर्भात दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी मा. पालकमंत्री, नाशिक यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी झाली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून व त्यानुसार संबंधीतांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) होय,

सुरगाणा तालुक्यातील बोरगाव, सुरगाणा, बाऱ्हे, उंबरठाण व पांगारणे येथे अवैध मटका व जुगाराचे अड्डे चालू असल्याचे आढळून आले नाही. दरम्यान दारुबंदीचे १२ प्रकरणे केलेले आहेत. चोरुन लपून अवैध मटका जुगार खेळताना आढळून आल्यास त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येईल.

(४) विलंब झालेला नाही.

---

## लासुर स्टेशन व वाळुंज (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथे नवीन पोलीस स्टेशनला मंजुरी मिळणेबाबत

**(२२) १०९७५ (०६-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासुर स्टेशन वाळुंज (ता.गंगापूर जि.औरंगाबाद) मध्ये नवीन पोलीस स्टेशन निर्मितीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री गृह यांचेकडे दिनांक ७ मे, २०१३ रोजी पत्र व्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस स्टेशन निर्मितीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील ६१४९४ पदनिर्मितीच्या पुढील टप्प्यात लासुर व वाळुंज पोलसी ठाण्याचा समावेशक करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी शहरासह ग्रामीण भागातील चौकाचौकात राजरोसपणे मटका व जुगार खेळला जात असल्याबाबत

**(२३) ११००० (०६-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरासह ग्रामीण भागातील चौकाचौकात राजरोसपणे मटका व जुगार खेळला जात असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील माळी गल्ली येथील एका पाणपट्टीवर कल्याण नावाचा मटका सुरु असतांना नानलपेट पोलिसांनी दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी कारवाई केली आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :** (१) परभणी शहरासह ग्रमीण भागात राजरोसपणे मटका खेळला जात नाही. तथापि चोरुन लपून मटका जुगाराच्या घटनांची माहिती काढून सन २०१५ मध्ये अशा मटका जुगाराच्या ११९ गुन्ह्यात २१० आरोपींना अटक करुन रु.९३६३४५/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच इतर जुगाराच्या २० गुन्ह्यात ७२ आरोपींना अटक करुन रु.५२५७६०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) प्रकरणी नानलपेठ पोलीसांनी छापा टाकून आरोपी विरुध्द नानलपेठ पोलीस स्टेशन परभणी येथे गु.र.नं. ३००१/१५ कलम १२ (अ), मु.जु.का. अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक केली आहे. दि.२७/०२/२०१५ रोजी न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील मुलांच्या वसतीगृहामध्ये विद्यार्थ्यांची रॅगिंन होत असल्याबाबत

**(२४) ११००७ (०६-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील मुलांच्या वसतीगृहामध्ये सर्रासपणे विद्यार्थ्यांची रॅगिंग होत असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१४ रोजी कृष्णा गव्हाणे व शेख मोखिल या ज्युनिअर विद्यार्थ्यांना सिनिअर विद्यार्थ्यांनी नमस्कार करीत जा असे म्हणत दारु पिऊन बेदम मारहाण केली याप्रकरणी मोंढा पोलीस ठाण्यात सात विद्यार्थ्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,
(४) चौकशीत काय आढळून आले आहे, तदनुसार दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :** (१), (२), (३) व (४) होय, सदर प्रकरणी फिर्यादीवरुन मोंढा पोलीस ठाणे येथे गु.र.नं ३०२/२०१४ भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६, ३४ महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध कायदा ३,४,७ अन्वये दिनांक ०१/१२/२०१४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या गुन्ह्याप्रकरणी सात आरोपींना अटक करण्यात आली असून दिनांक ०४.०१.२०१५ रोजी न्यायालयात त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल करणत आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिरसगाव बोडखा (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील शेतक-यांचे सुमारे ५० शेतीपंप चोरल्याबाबत

**(२५) १११६५ (०६-०४-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरसगाव बोडखा (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील शेतक-यांचे सुमारे ५० शेतीपंप चोरट्यांनी चोरुन नेल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे ओह काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई केली वा  करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही,

माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये रु.५०००/- किमतीची एका शेतक-यांच्या शेतातील एक इलेक्ट्रीक मोटार चोरी झाल्याबाबत श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१७८/१४ भ.द.वि.कलम ३७९, ४११, ३४ प्रमाणे एक गुन्हा दाखल आहे.
(२) उक्त नमूद वीज मोटार चोरीच्या गुन्ह्याचा तपास करुन गुन्ह्यात निष्पन्न ५ आरोपींना अटक करुन चोरी गेलेला रु.५०००/- किंमतीचा शेती पंप हस्तगत करण्यात आला असून त्यांचेकडून इतर चोरीच्या गुन्ह्यातील ४ विविध कंपनीचे शेतीपंप हस्तगत करण्यात आले आहेत.
(३) विलंब झालेला नाही.

---

## एसआरएचे तत्कालिन मुख्य अधिकारी यांच्यासह वरिष्ठ आयपीएस अधिकारी यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने नोंदविलेला गुन्हा

**(२६) १२२०१ (०७-०४-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एसआरए योजनेमध्ये खोटी कागदपत्रे सादर करुन क्षेत्रफळ वाढविणे व विकासकाला मदत केल्याच्या आरोपावरुन एसआरएचे तत्कालिन मुख्य अधिकारी उज्वल उके यांच्यासह वरिष्ठ आयपीएस अधिकारी देवाशिष चक्रवती यांच्यावर नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने गुन्हा नोंदविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी मा.विशेष न्यायालयाच्या दिनांक ५.११.२०१४ च्या आदेशाविरुध्द संबंधित अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या क्रिमिनल रिट पिटीशन क्रमांक ४७६५/१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने सदर गुन्ह्याच्या तपासास स्थगिती दिली आहे.

---

## कोल्हापूरात पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

**(२७) १२९०० (०७-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर व इचलकरंजी शहरातील वाढती लोकसंख्या व पोलीस दलावर पडणारा ताण लक्षात घेता कोल्हापूरात पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या ३० वर्षापासून विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आयुक्तालय स्थापन करण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरीक, सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, विविध संस्था यांच्यासह सन १९८५ पासून तत्कालीन प्रत्येक पोलीस अधिक्षकांनी शासनाकडे वारंवार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांनी पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांच्याकडून पोलीस आयुक्तालय निर्मितीचा सुधारीत प्रस्ताव मागविला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील डहाणूच्या साईन वन सर्कलचे तलाठी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केल्याबाबत**

**(२८) १२९१९ (०७-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील डहाणूच्या साईन वन सर्कलचे तलाठी देवमन शेषराम शिरसाठ यांना आईचे नाव सातबाराच्या उताऱ्यावर नोंद करण्यासाठी १० हजार रुपयांची लाच घेतांना दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) श्री.मनोज पेसू पारधी यांनी केलेल्या तक्रारीनुसार तलाठी श्री.देवमण शेषराव शिरसाठ यांना रु.१० हजार इतकी लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. या प्रकरणी त्यांचेविरुध्द कासा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.०२/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२) अन्वये दिनांक ३.२.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तलाठी श्री.देवमण शिरसाठ यांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर मा.न्यालयाने त्यांना दिनांक ०६.०२.२०१५ रोजी जामीनावर मुक्त केले आहे. प्रस्तुत गुन्ह्याच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता देण्यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच तलाठी श्री.शिरसाठ यांना दिनांक ०७.०२.२०१५ च्या आदेशान्वये अटकेच्या दिनांकापासून (दिनांक ०३.०२.२०१५) शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

**मुंबई वांद्रे पूर्वकडील मोतीलाल नगर को.ऑ.हौ, सोसा.या एसआरए योजनेतील अनियमिततेबाबत**

**(२९) १२९३४ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वांद्रे पूर्वकडील मोतीलाल नगर को.ऑ.हौ, सोसा.चा एसआरए योजनेअंतर्गत विकास करताना अपात्रांना गाळे देणे, त्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करणे, अधिक क्षेत्रफळ वापरणे इ.जबाबदार असणा-या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहे डिसेंबर, २०१४ दरम्यान मा.न्यायालयाच्या आदेशान्वये गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबीची चौकशी करुन अनियमिततेस जबाबदार असणा-या विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी मा.विशेष न्यायलयाच्या दिनांक ५.११.२०१४ च्या आदेशाविरुध्द संबंधित अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या क्रिमिनल रिट पिटीशन क्रमांक ४७६५/१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने सदर गुन्ह्याच्या तपासास स्थगिती दिली आहे.

---

**वैजापूर (जि. औरंगाबाद) रुग्णालय अधिक्षक यांना लाच घेताना अटक करण्यात आल्याबाबत**

**(३०) १५५९७ (०७-०४-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर (जि. औरंगाबाद) रुग्णालय अधिक्षक गोविंद नरवणे यांनी पगाराचे बिल मंजूर करण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच घेताना दि. २९.१.२०१५ रोजी च्या सुमारास अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१५) :** (१), (२) व (३) तक्रारदार डॉ.संदीप जाधव, वैद्यकीय अधिकारी, उप जिल्हा रुगणाल, वैजापूर, जि.औरंगाबाद यांचे माहे ऑगस्ट, २०१४ ते डिसेंबर, २०१४ या कालावधीचे थकीत वेतन मंजूर करणेसाठी डॉ.गोविंद नरवणे, वैद्यकीय अधिक्षक, उप जिल्हा रुग्णालय, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना रु.३०,०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. या प्रकरणी त्यांचेविरूध्द वैजापूर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.३००३/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७,१३ (१)(ड) सह १३ (२) अन्वये दिनांक २४.१.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात त्यांना दिनांक २४.०१.२०१५ रोजी अटक करण्यात आली. त्यानंतर मा.न्यायालयाने त्यांना जामीनावर मुक्त केले आहे. त्याचप्रमाणे आरोपी लोकसेवक यांचे घराची व लॉकरची झडती घेतली असता डॉ.नरवणे व त्याचे पत्नीचे नावे रु.८१,२९,९००/- एवढी मालमत्ता आढळून आली आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

---

**भोर (जि.पुणे) शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध व्यावसाय सुरु असल्याबाबत**

**(३१) १६१०३ (०८-०४-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध दारुधंदे, मटका, जुगारीचे अड्डे व इतर अवैध व्यवसाय सर्रासपणे सुरु असून रोज लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) भोर शहर व परिसरामध्ये असे चोरुन धंदे करणारे इसमांची माहिती गोपनियरित्या मिळवून माहे जानेवारी ते मार्च, २०१५ या कालावधीत दारुबंदी ४ गुन्हे दाखल करुन ३ लि. गावठी हातभट्टी दारु, ६२ देशी दारुच्या कॉटर असा एकूण रु.२०१३/- चा माल जप्त करण्यात आला आहे. तसेच जुगाराची एक केस करुन जुगाराचे साहित्य व रोख रक्कम असा एकूण रु.२,६७०/- चा माल जप्त करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**बेस्टच्या दैनंदिन तिकिटाचे दर वाढल्याबाबत**

**(३२) १६९५० (३१-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेस्टच्या दैनंदिन तिकिटाचा १ एप्रिलपूर्वी रूपये ४० असलेला दर आता रूपये ७० झाला असल्याने बेस्टची प्रवासी संख्या कमी झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात तिकीट विक्रीत घट झाल्याने त्याचा भविष्यात महसूलीवर परिणाम होणार असल्याने यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१५) :** (१) बेस्ट उपक्रमाची प्रवासी संख्या माहे एप्रिल, २०१५ मध्ये कमी झाली हे खरे आहे.

मात्र दैनंदिन बसपास रु.७०/- केल्यामुळे प्रवासी संख्या कमी झाली नसून, सर्वसाधारणत: प्रवास भाड्याचे सुसूत्रीकरण केल्यानंतर प्रवासी संख्येमध्ये काही प्रमाणत घट होत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) बेस्ट उपक्रमाच्या प्रवासी संख्येमध्ये घट होत असल्याचे निदर्शनास आले असले तरी बेस्टच्या महसुलात घट झालेली नाही. परंतु महसूलात अंदाजित वाढीपेक्षा कमी महसूल प्राप्त होत आहे.

सदर महसुलात वाढ होण्याकरिता व प्रवाशांना आकर्षित करण्याकरिता बेस्ट उपक्रमांतर्फे खालीलप्रमाणे उपाययोजना कार्यन्वित करण्यात आल्या आहेत :-

- शालेय विद्यार्थ्यांच्या बसपास मूल्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कपात
- रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दैनंदिन बसपासकरिता RF-ID स्मार्टकर्डची अनिवार्यता रद्द
- वातानुकूलित बससेवांवर मुलांकरिता सवलतीचे प्रवास भाडे

तसेच शहरी व उपगरीय प्रवासाकरिता अनुक्रमे रु.४०/- आणि रु.५०/- असे वेगवेगळ्या मुल्यवर्गाचे बसपास उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**नांदेड, भंडारा व गोंदिया जिल्हयातील सीसीटीव्ही कॅमे-यांबाबत**

**(३३) १७१०८ (१२-०८-८२०७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिस स्टेशन परिसर व संवेदनशील ठिकाणी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सीसीटीव्ही कॅमेरे लावणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास नांदेड शहरातील विविध भागात बसविण्यात आलेल्या एकूण ९७ पैकी केवळ ७ सीसीटीव्ही कॅमेरे सुरु असल्याने काही गुन्हयांचा तपास करण्यात पोलीसांना अपयश आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, भंडारा व गोंदिया या नक्षलप्रभावित जिल्हयाकरीता निधी उपलब्ध नसल्यामुळे एकाही पोलिस स्टेशन परिसरात तसेच संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नसल्याचे माहे जून, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, नांदेड येथील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्तीबाबत तसेच भंडारा व गोंदिया जिल्हयाकरीता सीसीटीव्ही कॅमे-यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :** (१) होय.

(२) नांदेड शहरामध्ये माहे मे महिन्यात अचानक झालेल्या गारपीट/वादळ/पावसामुळे केबल तुटुन लाईट बंद झाल्याने दि. ०९/०५/२०१५ रोजी ९० कॅमेरे बंद होते.

(३) व (४) राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये शासनातर्फे सीसीटीव्ही बसविण्यात आलेले नाहीत. डीपीडीसी वा अन्यमार्गाने (संबंधित आस्थापना) निधी उपलब्ध करुन काही संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि. २४/७/२०१५ रोजीचा निर्णय तसेच मा.उच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेऊन राज्यातील संवेदनशील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे येथील दत्तवाडी आणि भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच दिवशी खुनाच्या तीन घटना घडल्याबाबत**

**(३४) १७६२५ (१२-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील दत्तवाडी आणि भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच दिवशी खुनाच्या तीन घटना घडल्या आहेत त्यापैकी एकाही मृतदेहाची अद्‌याप ओळख पटली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीनही खुनाच्या संदर्भात तपास करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) पुणे शहर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक ०३ मे, २०१५ रोजी खुनाच्या दोन घटना घडल्या असून भरती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक ०४ मे, २०१५ रोजी खुनाची एक घटना घडली आहे. वरील तिन्ही गुन्हे उघडकीस आले आहेत.

(२) (i) दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे अनिल दत्तात्रय कसबे यांनी केलेल्या फिर्यादीवरुन गु.र.क्र. १२०/२०१५,, भा.दं.वि. कलम ३०२, १४३, १४८, १४९ मुपोॲ क्र.३७(१) सह १३५, आर्म ॲक्ट ४(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अनुषंगाने चौकशी केली असता दिनांक ०३ मे, २०१५ रोजी हाजीमिया दर्ग्याचा उरुस पाहून घरी परतत असताना नितीन दत्तात्रय कसबे यांच्यावर आपासांतील भांडणाच्या अनुषंगाने ५ जणांनी हल्ला करुन त्यांचा खून केला.

याप्रकरणी सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(ii) दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे केलेल्या फिर्यादीवरुन गु.र.क्र. १२१/२०१५, भा.दं.वि. कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अनुषंगाने चौकशी केली असता गणेश मनोहर होले व दत्तात्रय मोतीराव पवार यांच्यामध्ये दारु पिण्यासाठी पैसे मागण्याच्या कारणावरुन भांडणे होऊन त्यामध्ये दत्तात्रय पवार यांच्यावर गणेश होले यांनी डोक्यात दगड घालून त्यांचा खून केला. गणेश होले यांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(iii) भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १५५/२०१५, भा.दं.वि. कलम ३०२, २०१, ३४, १४९, १२० ब व महाराष्ट्र पोलीस कायदा क्र. ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. या प्रकरणी चौकशी केली असता, दिनांक ०४ मे २०१५ रोजी सकाळी ०९.०० वा रवि जाधव, गणेश शिंदे, सिध्देश मुळे, बालाजी सुर्यवंशी, रमेशी कोळी, देवेंद्र पाडळे यांचे प्रविण उबाळे यांच्याशी मोबाईल फोन व मोटर सायकलच्या चावीवरुन झालेल्या भांडणावरुन त्यांनी दांगटशाळा वडगांव, पुणे च्या समोरील मोकळ्या जागेत प्रविण उबाळे यांच्या डोक्यात सिमेंटच्या विटा मारुन त्याचा खून केला व रमेश कोळी याच्या टाटा इंडिका गाडीतून त्याचे प्रेत कात्रज गावाच्या हद्दीत टाकून दिले. या प्रकरणी सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

वरील तिनही घटनांमध्ये मृतांची ओळख पटली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**वैजापूर (जि. औरंगाबाद) तालुक्यातील शहरी भागातील असलेल्या पोलीस ठाण्यात पोलीस अधिकारी व कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३५) १८०३४ (१०-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि. औरंगाबाद) तालुक्यातील शहरी भागातील असलेल्या पोलीस ठाण्यात पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची १०३ पदे मंजूर असतांना सुरक्षा व्यवस्थेसाठी अवघे ३० पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैजापूर शहरातील अतिसंवेदनशील विभाग लक्षात सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१५) :** (१) हे खरे नाही. सद्य:स्थितीत वैजापूर पोलीस ठाण्यास ६२ पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) व (३) पोलीस भरती २०१४ मधील ७९ प्रशिक्षणार्थी पोलीस शिपायांचे मुलभूत प्रशिक्षण पूर्ण झाले असून त्यामधून उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही केली जाईल.

---

**नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात नागरी जमीन कमाल धारणा अन्वये बांधकाम करण्यास परवानगी दिल्याबाबत**

**(३६) १९१८४ (११-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात गट नं. ८०७/३ ब च्या प्लॅट नं. ३, ८, १४, २३, २४, २९, ३०, ३१, ३६, ४८, ४९, १६, २७, २६, २९, ४७, १९, १८, १७, या वर नागरी जमीन कमाल धारणा अन्वये बांधकाम करण्यास शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असताना जिल्हाधिकारी नाशिक यांनी सदर जमिनीच्या व्यावसायीक वापरास तसेच नाशिक महानगरपालिकेने उक्त जमिनीवर बांधकाम करण्यास परवानगी व पुर्णत्वाचा दाखला देऊन मोठया प्रमाणावर गैरव्यवहार केल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधीतांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१५) :** (१) नागरी जमीन (कमाल धारणा व निनियमन) अधिनियम, १९७६ नुसार उक्त मिळकतीवर बांधकाम करण्यास परवानगी व पुर्णत्वाचा दाखला देऊन गैरव्यवहार केल्यासंदर्भातील स्थानिक नागरीकांची तक्रार जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडे दिनांक २३/०१/२०१३ रोजी व त्यासुमारास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथील दोघा विद्यार्थ्यांचा रत्नागिरी जिल्ह्यातील पूर्णगड खाडीत बुडून मृत्यू झाल्याची घटना**

**(३७) १९५४७ (१०-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील १९ विद्यार्थ्यांचा गट पुराणपठण आदी धार्मिक कार्य प्रशिक्षणासाठी दिनांक ७ एप्रिल, २०१५ रोजी मंगला एक्सप्रेसने रत्नागिरी येथे रवाना झाले होते त्यापैकी दोघा विद्यार्थ्यांचा रत्नागिरी जिल्ह्यातील पूर्णगड खाडीत बुडून मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील विद्यार्थ्यांच्या मृत्यु प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबियास शासनाने कोणत्या स्वरुपाची मदत केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप,कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१५) :** (१) मालेगाव, जि.नाशिक येथील दोन युवक रत्नागिरी जिल्ह्यातील पूर्णगड येथील खाडीत बुडून मृत्यू झाल्याची घटना दि. १४.४.२०१५ रोजी घडली आहे.

(२) सदर प्रकरणी पूर्णगड सागरी पोलीस ठाणे येथे आकस्मात मृत्यू रजिस्टर नं. ०६/२०१५ अन्वये नोंद घेण्यात आली आहे.

या प्रकरणी पोलीसांनी केलेल्या तपासात सदर युवकांचा बुडून मृत्यू झाला असल्याचे निष्पन्न झाले आहे. शवविच्छेदन अहवालात देखील त्यांचा मृत्यू बुडून झाल्याबाबत वैद्यकीय अधिकारी, रत्नागिरी यांनी नमुद केले आहे. तसेच, मृतांच्या नातेवाईकांनी याबाबत संशय व्यक्त केलेला नाही.

(३) सदर घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना मदत अनुज्ञेय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या सागरी किना-यांवरील संरक्षणाच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत**

**(३८) २४९६५ (१२-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारताच्या सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी केंद्र शासनाने उपाययोजना करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने राज्याच्या किनारपट्टीवरील १७३ लँडिंग पॉईटस् किना-याच्या सुरक्षेसाठी कोणती उपाययोजना वा यंत्रणा तयार केली आहे,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील २३ लँडिंग पॉईंटसच्या संरक्षणासाठी वॉर्डनची नेमणूक करण्यात आली आहे काय,

(३) शासनाने सागरी किना-यांवरील संरक्षणाच्या दृष्टीने उपाययोजना व यंत्रणा कार्यान्वीत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१५) :** (१) सर्व लँडींग पॉईटवर संबंधित सागरी पोलीसांकडून नियमित पोलीस बोटी व वाहनांद्वारे केलेल्या गंस्तीमध्ये संशयित व्यक्ती व वाहनांची तपासणी केली जाते. तसेच शासनाने कंत्राटी पध्दतीने फिशरी वॉर्डन (सुरक्षा रक्षक) व पर्यवेक्षक नेमण्यास मत्स्य व्यवसाय विभागास शासनाने मंजूरी दिली आहे.

(२) रत्नागिरी जिल्हयातील २३ लँडीग पॉईटसवर मत्स्य व्यवसाय विभागाकडून कंत्राटी पध्दतीने फिशरी वॉर्डन (सुरक्षा रक्षक) नेमण्यात आलेले आहेत.

(३) केंद्र शासनाच्या व राज्य शसनाच्या बोटीमार्फत सागरी गस्त करण्यात येते. सागरी जिल्हयामध्ये २५ जुनी पोलीस स्टेशन असून फेज १ अंतर्गत १२ व फेज २ अंतर्गत ६ नवी पोलीस स्टेशन निर्माण करण्यात आलेली असून जुनी ५९ चेकपोस्टस व नवीन ३२ चेकपोस्ट्स कार्यरत आहेत. सागरी पोलीस ठाण्यात पोलीसांना संशयास्पद हालचालींची माहिती देऊन मदत करण्यासाठी किनारी गावामध्ये नागरीकाची सागरी सुरक्षा दले निर्माण करण्यात आलेली आहेत. १५४२ पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना कोस्ट गार्डतर्फे मरीन परिक्षण देण्यात आलेले आहे. पोलीस नियंत्रण कक्षामध्ये सागरी सुरक्षेकरीता टोल फी हेल्प लाईन क्र. १०९३ सुरु केलेली आहे. मत्स्य व्यवसाय विभागातर्फे मच्छीमारांना बायोमेट्रीक कार्ड देण्यात येत आहेत.

---

**चेंबुर ते मानखुर्द परिसरात महानगरपालिकेने प्रकल्पबाधितांना राहण्यासाठी बांधलेल्या घरात ३०० घुसखोरांनी घुसखोरी करुन सुरक्षारक्षकांच्या संगनमताने अतिक्रमण केल्याचा प्रकार**

**(३९) २५७४८ (१०-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील चेंबुर ते मानखुर्द परिसरात महानगरपालिकेने प्रकल्पबाधितांना राहण्यासाठी बांधलेल्या घरात ३०० घुसखोरांनी घुसखोरी करुन सुरक्षारक्षकांच्या संगनमताने अतिक्रमण केल्याचा प्रकार माहे जून, २०१५ च्या दुस-या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिक्युरिट गार्ड पुरविणा-या ईगल आणि विशाल या दोन कंपन्यांना काळ्या यादीत टाकून त्यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी महानगरपालिकेच्या नगरसेवकांनी संबधित अधिका-यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे, तसेच प्रकल्पबाधित रहिवाश्यांची राहण्याची कोणती व्यवस्था करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही. तथापि प्रकल्पबाधित रहिवासी उपलब्ध झाल्यास त्यांना पर्यायी PAP देण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणकन्या एक्स्प्रेसमध्ये ७२ लाखांचे दागिने लुटल्याच्या घटनेबाबत**

**(४०) २८४७३ (२१-०१-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मडगावहून सीएसटी मुंबई येथे येणाऱ्या कोकणकन्या एक्स्प्रेसमध्ये पनवेल येथे ७२ लाखांचे दागिने लुटल्याची घटना दि. ५ ऑगस्ट, २०१५ रोजी घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.

सदर प्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठणे गु.र. नं. ५५/२०१५ भा.दं.वि. कलम ३९४, ३४ ३९५, ३९७ व १२० (ब) व भारतीय हत्यार कायदा कलम ३ व २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एक आरोपीस जामीन देण्यात आला आहे. तसेच १ आरोपीस अटक करणे बाकी आहे. सदर आरोपींकडून चोरीस गेलेल्या रुपये ७१,५६,०००/- किमतीच्या सोन्याच्या दागिन्यांपैकी १७,७१,२००/- रु. किंमतीची सोन्याची लगड जप्त करण्यात आली आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात माहिती अधिकारातील लाखो रुपयांच्या दंडाची वसुली करण्याबाबत दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(४१) २८९२८ (२१-०१-२०१६). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहिती अधिकारातील लाखो रुपयांच्या दंडाची वसुली करण्याबाबत प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे तसेच शिस्तभंगाच्या कारवाईच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचेही माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच विविध सार्वजनिक प्राधिकरणांकडून आपल्या विभागाशी संबधित माहिती संकेत स्थळावर अद्याप जाहीर करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) नाही.
(२) अंशतः खरे आहे. काही विभागाशी संबंधित संकेतस्थळे अद्ययावत झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) व (४) राज्य माहिती आयोगाकडून पारित होणारे निर्णय निर्देश इ.चे पालन काटेकोरपणे करण्याचे आदेश शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१४/प्र.क्र.(२४०/१४) सहा दि. १३.२.२०१५ रोजी देण्यात आलेले आहेत. त्यानुसार माहिती अधिकारात आयोगाने केलेल्या दंडाची वसुली करण्याची जबाबदारी संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांचे आहरण व संवितरण अधिकाऱ्यांवर तसेच कार्यालय प्रमुखावर सोपविण्यात आलेली आहे. माहिती अधिकारात आयोगाने केलेल्या दंडाची संबंधितांकडून होत असलेल्या वसुलीबाबतची माहिती तसेच शिस्तभंगाच्या कारवाईबाबतची माहिती आयोगाच्या सन २०१४ च्या अहवालातही प्रसिध्द करण्यात आलेली आहे. विभागाशी संबंधित माहिती संकेत स्थळावर अद्ययावत करण्याच्या सूचनाही शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१३/१५६/प्र.क्र. ३६० सहा दि.९.५.२०१४ व क्र.संकिर्ण २०१५/(प्र.क्र.२५२/१५) सहा दि. २८.१.२०१६ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

---

**खामगाव शहर (जि.बुलडाणा) येथील तत्कालीन पोलिस निरीक्षक यांच्या निलंबनाबाबत**

**(४२) २९१५९ (२१-०१-२०१६). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव शहर (जि.बुलडाणा) येथील श्री. डी. एम पाटील तत्कालीन पोलिस निरीक्षक यांनी ६५ नग बेवारस सायकली व इतर मुद्देमाल विक्रीमध्ये भ्रष्टाचार केल्याप्रकरणी दिनांक २६ मार्च २०१५ रोजी विधान परिषद सभागृहात त्यांना निलंबित करण्याचे आश्वासन मा.गृह राज्य (ग्रामीण) यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री पाटील यांची खामगाव शहर (जि.बुलडाणा) येथून ठाणे शहर येथे बदली झाली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई न करता ठाणे शहर वरून त्यांच्या मुळ जिल्हयात अमरावती शहर येथे त्यांची क्र. ३/१०/६ अशत: बदल/ ५७८/२०१४ महाराष्ट्र पोलिस मुख्यालय, १२/०६/२०१५ नुसार बदली करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर भ्रष्टाचारी पोलिस अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित न करण्याची कारणे काय आहेत तसेच त्यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) पोलिस निरिक्षक श्री.डी.एम. पाटील यांची पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक १२.६.२०१५ च्या आदेशान्वये ठाणे शहर येथून अमरावती शहर येथे बदली करण्यात आली होती. तद्नंतर पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या दिनांक १४.७.२०१५ च्या आदेशान्वये श्री. डी.एम.पाटील, पोलिस निरिक्षक यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. श्री. पाटील यांचेविरुध्द चौकशी करण्यात आली असून त्यांना सक्त ताकीद ही शिक्षा देऊन दिनांक ४.९.२०१५ च्या आदेशान्वये पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी निलंबनातून मुक्त केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विविध गुन्हयांमध्ये आरोपी असणा-यांना शिक्षा होण्याचे प्रमाण कमी असल्याबाबत**

**(४३) २९८८८ (२१-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारने सादर केलेल्या राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या अहवालात राज्यात विविध गुन्हयांमध्ये आरोपी असणा-यांना शिक्षा होण्याचे प्रमाण केवळ १९ टक्केच असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुन्हेगारांना शिक्षा होण्यासाठी पोलीसांकडून होणारा तपास आणि वकिलांकडून न्यायालयात केला जाणारा युक्तीवाद या दोन्ही महत्वाच्या बाजू समाधानकारक नसल्याचे अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. राष्ट्रीय गुन्हे अभिलेख केंद्र नवी दिल्ली (एन.सी.आर.बी.) या कार्यालयाने सन २०१४ या वर्षाचा क्राईम इन इंडिया हा गुन्हे विषयक अहवाल, ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान प्रकाशीत केलेला असून, अहवालात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे भारतीय दंड विधान अंतर्गत गुन्हे शाबित होण्याचे प्रमाण (आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण) १९.३% असे आहे. तसेच विशेष व स्थानिक कायद्यांतर्गत गुन्हे शाबिताचे प्रमाण हे २६.५% आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही. तथापि, राज्यातील दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने विविध उपाययोजना केल्या असून त्या अनुषंगाने दि. १२.०५.२०१५ अन्वये १४ शासन निर्णय निर्गमीत केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील वाकडेवाडी शिवाजीनगर भुयारी मार्गात एका कंपनीच्या सुपरवायझरकडील २५ लाख रुपये लुटण्यात आल्याबाबत

**(४४) ३०३७५ (२१-०१-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील वाकडेवाडी शिवाजीनगर येथे भुयारी मार्गात कंपनीची रक्कम घेवून दुचाकीवरुन निघालेल्या सुपरवायझरला रस्त्यात अडवून मारहाण करत सात जणांनी त्याच्याकडील २५ लाख रुपये लुटून नेल्या प्रकरणी खडकी पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्याचा शासनाने तपास करुन संबंधित दरोडेखोरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१६) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन खडकी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २२१/२०१५ भा.दं.वि. कलम ३९५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करुन त्यांचे विरुध्द प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी कोर्ट येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील वरळी येथील पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या पोलिसाने वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांस जखमी केल्याबाबत**

**(४५) ३०४०५ (२१-०१-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या पोलिसाने वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांवर दि. २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास लाकडी दांड्याने डोक्यात वार करुन गंभीर जखमी केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी वरळी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. ३३०/१५ कलम ३५३, ३३२, ५०४, भा.द.वि. सह ८५(१) दारुबंदी प्रबिंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्ह्यातील पोलीस शिपायास अटक करण्यात आली आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषरोपपत्र दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे. आरोपीस पोलीस सेवेतुन निलंबित करण्यात आले असून त्यांचे गैरवर्तन बद्दल त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न सन्मान देण्याबाबत**

**(४६) ३२२८५ (२१-०१-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन आपले संपूर्ण जीवन देश सेवेसाठी समर्पित केलेले स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न सन्मान देण्याची सर्वत्र मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दिनांक १२ सप्टेंबर, २०१५ वा त्या दरम्यान अनेक जिल्ह्यामध्ये या मागणीसाठी नागरीकांनी स्वाक्षरी मोहिम राबविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०२-२०१६) :** (१) व (२) स्वातंत्रवीर सावरकर यांना भारतरत्न पुरस्कार देण्याबाबत काही मान्यवर व काही सामाजिक संस्थाकडून शासनाकडे मागणी करण्यात येत आहे.

(३) भारतरत्न पुरस्कारासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनामध्ये "The recommendation for Bharat Ratna are made by the Prime Minister himself to the President. No formal recommendations for this are necessary." असे नमूद केले आहे. तथापि, राज्य विधानमंडळात वेळोवेळी मांडण्यात आलेले ठराव, झालेल्या चर्चा व त्या अनुषंगाने तत्कालीन मा.मुख्यमंत्री/मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनांच्या अनुषंगाने स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार मिळण्याबाबत सन १९९८ मध्ये केंद्र शासनास शिफारस करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील सिंहगड रोड परिसरात रोडरोमिओचा धुमाकूळ सुरु असल्याबाबत

**(४७) ३३२४१ (२१-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील सिंहगड रोड परिसरातील नऱ्हे, धायरी वडगांव बुद्रुक, माणिक बाग व परिसरात लहान मोठी महाविद्यालये, शाळा, तसेच मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची वसतिगृहे असल्याने अनेक विद्यार्थिनी भाड्याने घरे घेवून राहत असून स्थानिक नागरिकांसह ये-जा करणाऱ्या शालेय-महाविद्यालयीन तरुणींना काही गुंड प्रवृत्तीचे तरुण मद्य प्राशन करुन रात्री अपरात्री छेडछाड व अश्लील वर्तनाने त्रास देत असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस दुर्लक्ष करीत असल्याने शासनाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) सिंहगड रोड पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात २४ तास प्रभावी गस्त ठेवण्यात आली असून डी.बी. पथकाचे साध्या गणवेशातील अधिकारी व कर्मचारी यांची गस्त नेमून वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करण्यात येते. तसेच पोलीस चौकी अंमलदार व बिट मार्शल यांची गस्त नेमण्यात आली असून त्यांना शाळा व महाविद्यालय सुटण्याचे वेळी नमूद परिसरात गस्त करुन रोडरोमियो यांचेवर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सिंहगड रोड पालिस ठाण्याचे कार्यक्षेत्रातील कॉलेज शाळा यांना वारंवार पोलीस भेटी देऊन मिटिंग आयोजित करुन मुलांना या प्रकाराबाबत पोलीस मदत घेणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड येथील विमान सेवा सुरु करण्याबाबत

**(४८) ३४५७५ (२१-०१-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील विमानतळ विमानसेवेसाठी पूर्णपणे सज्ज आहे. पयाभूत सेवेचा विकास झाला आहे ७०-८० सीटाचे कॅनेडियन जेट विमानाची सेवा कधीही सुरु केली जाऊ शकणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निर्णय घेवून येथे विमान सेवा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१६) :** (१) व (२) राज्यातील सर्व विमानतळे हवाई मार्गे जोडण्यासाठी सर्वसमावेशक धोरण ठरवण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर येथे तथागत बुध्द विहारात वर्षावास करण्याऱ्या भिक्खू आर्यसूत यांच्यावर केलेल्या हल्ल्याबाबत

**(४९) ३५०६० (२१-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथे तथागत बुध्द विहारात वर्षावास करण्याऱ्या भिक्खू आर्यसूत यांच्यावर दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या हल्ल्याप्रकरणी समाजकंटकावर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास भिक्खू संघाचे पदाधिकारी यांनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्याता येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पोलिस स्टेशन, चंद्रपूर शहर येथे अपराध क्र.१८९/९५ भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३५२, ३४२, ३२३, ५०४, अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीविरुध्द भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३५२, ३४२, ३२३, ५०४, ४५२, २९५, २९६ सहकलम १३५ मु.पो.का. अन्वये न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उचली (ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) येथील शालीकराम ढोरे यांच्या हत्येच्या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत**

**(५०) ३५५८७ (२१-०१-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उचली (ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) येथील शालीकराम गोरूजी ढोरे यांची दिंनाक ३० जुलै, २०१५ रोजी दोन अज्ञात इसमांनी हत्या केली असून या घटनेची चौकशी करून आरोपीस अटक करण्यात यावी अशी तक्रार संशयीत आरोपीच्या नावासहीत मृतकाच्या पत्नीने विभागीय आयुक्त नागपूर, जिल्हाधिकारी चंद्रपूर, जिल्हा पोलीस अघिक्षक चंद्रपूर यांच्याकडे माहे सप्टेबर, २०१५ च्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने उप विभागीय पोलीस अधिकारी, मुल यांनी पोलीस स्टेशन, ब्रम्हपुरी येथे जावून पाहणी केली. त्यांनुसार दिनांक ३०.७.२०१५ रोजी फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरुन अप क्र..१०१/१५ भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ४२७, ३०४ (अ) सह १८४ मो.वा.का. चा गुन्हा दाखल असून मृतकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवून फिर्यादीचे सायकलला धडक मारल्याने जखमी झाला. तसेच आरोपी सुध्दा जखमी झाला होता. उपचारादरम्यान आरोपीचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले. सदर प्रकरणात कोणत्याही प्रकारचा घातपाताचा प्रकार निदर्शनास आलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.